प्रकाश गोळे

# इथे तर मंदी कायमचीच!

वार्षिक पाऊस जेमतेम ४०० मि.मी., तोही अनिश्चित. वर्षानुवर्ष केव्हा पडेल काही सांगता येत नाही. दर चार-पाच वर्षांनी अवर्षण आणि दुष्काळ ठरलेला. २००३, २००४, २००५ सलग तीन वर्षे अवर्षण; २००८ सालीही पावसाची हुलकावणीच. अशा परिस्थितीत, अशा मुलखात एक वनविहार आहे, फळफळावळ, भाज्या आणि फुलांनी नटलेला मळा आहे, एक सुंदरसे तळे आहे, त्यावर असंख्य पक्षी स्वच्छंद विहार करताहेत यांवर कोणाचा विश्वास बसेल का? पण ही किमया साकार केली आहे विंचुर्णीच्या बाबुलाल गांधींनी!

फलटणपासून तीन-चार किलोमीटर अंतरावर असलेल्या विंचुर्णीत हे आश्चर्य परिसराला खुलवीत उभे आहे. या शंभर एकर एवढ्या शेताचा वारसा बाबुलाल आणि त्यांचे बंधू यांना मिळाला आणि अपार कष्ट करून त्यांनी इथे वनविहार आणि मळा उभे केले. स्वतः बाबुलाल यांना विनोबांचा सहवास लाभलेला. भूदान चळवळीत मिळालेल्या जमिनीचे वाटप करण्यात त्यांनी लक्षणीय कामगिरी बजावलेली आणि महात्माजींची तत्त्वं आणि कार्यपद्धती निष्ठापूर्वक आपलीशी केलेली. त्यामुळे त्यांची शेती-बागायत पूर्णतः सेंद्रिय (~~ऑर्गॅनिक~~ - ऑर्गॅनिक) आहे. पाळलेल्या गायीही उत्तम पण देशी वाणाच्या आहेत.

वनविहार आणि मळा एकमेकांना पूरक आहेत. वनविहारातील कुरणातून गुरांना भरपूर नैसर्गिक चारा मिळतो, इथे निर्माण होणारा जैवभार (बायोमास) शेती-बागायतीला नैसर्गिक खत पुरवितो. तळ्यापासून विहि-रींना पाणी मिळते आणि अवर्षणाची तीव्रता इथे फारशी जाणवत नाही. शिवाय दाट झाडीत दडलेला ओढा आणि वृक्षराजीने नटलेला तळ्याचा परिसर आणि पाणपसारा विविध प्राणी, पक्षी आणि कीटक यांना भोजन आसरा पुरवितात.

बाबुलालांना त्यांच्या कुटुंबियांची साथ मिळाली नसती तर फलटणच्या या मरुभूमीत हे आश्चर्य उभं राहणं अवघड झालं असतं. त्यांच्या दोन ~~मुलींनी~~ पुतण्यांनी बॅचलर ऑफ अॅग्रीकल्चर ही पदवी संपादन केली खरी पण हरित क्रांती प्रणीत आधुनिक शेतीचा मार्ग न धरता त्या सेंद्रिय शेती आणि निसर्गसंवर्धनात रममाण झाल्या. या कुटुंबानं इथल्या खडकाळ माळांना अक्षरशः बोलकं केलं. हुशारीनं आणि नियोजनपूर्वक जमिनीचा वापर केला तर निसर्ग कसा प्रसन्न होतो हे इथं पहायला मिळतं.

बाबुलाल गांधींनी उभं केलेलं हे प्रतिमान डोळ्यांत भरतं ते त्यांच्या सर्वंकष दृष्टिकोनामुळे, जमीन, पाणी आणि जैविक घटक यांचा त्यांनी जो साकल्याने विचार केला आहे त्यामुळे. नाहीतर, या एकेकाळच्या शुष्क प्रदेशाला कायापालट करणारे इतर प्रयत्नही इथे जारी आहेत की. कित्येकांनी दुरवरून सुपीक माती आणि पाणी आणून ते माळावर

परसरून डाळिंबाची, लिंबूची बागायती केली आहे. ~~सुरुवातीला~~ सुरुवात: हा धनगरांचा प्रदेश. एकेकाळी इथे लोक गायी-गुरं पाळीत होते; जेव्हा जमीन त्यांना पुरेसा चारा देण्यास असमर्थ होऊ लागली, तेव्हा लोक मेंढ्या आणि शेळ्या पाळायला लागले. पण आज धनगर वस्तीवर गेलं तर काय ऐकायला मिळतं, निम्म्या वस्तीने धनगरी पेशा सोडून शेती करायला सुरुवात केली आहे; मेंढरं विकून आलेल्या पैशांतून जमीन खरेदी केली आहे. मेंढ्यांना सतत होणारे रोग, त्यावर खात्रीशीर इलाजांचा अभाव, चाऱ्याची कमतरता वगैरे कारणे मेंढपाळी सोडून देण्यास जबाबदार आहेत. पण कोरड्या प्रदेशात शेती करणे कितपत योग्य आहे? आणि शेती तरी फायदेशीर ठरणार आहे का?

कापशीसारख्या एखाद्या गावाने ओढ्यावर बंधारे बांधून पाण्याची साठवण केली आहे आणि त्याचा फायदा गावातील विहिरींच्या पाण्याची पातळी वाढण्यात झाला आहे. कापशीजवळच्या धनगर वस्तीलाही हा फायदा जाणवतो. त्यामुळेच त्या वस्तीतील धनगरांनी मेंढपाळी सोडून शेतीला सुरुवात केली आहे. पण यंदा पावसाने हुलकावणी दिल्याने कापशीतील ओढ्यांच्या बंधाऱ्यांमागे पाणीच नाही. विहिरीतील पाणी पुरेसे नसल्याने यंदा खरीप आणि रब्बी दोन्ही हंगामात पिकेच घेता आलेली नाहीत. २००९ मध्येही पाऊस पडला नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर होणार आहे.

शेतीची देशभरची परिस्थिती पाहिली तर १९५०-५१ नंतर शेतीची पीछेहाट होत आहे असे चित्र दिसते. १९५०-५१ ते १९९६-९७ या काळात सिंचनाखालील क्षेत्र दरवर्षी सरासरी २.५२ टक्क्यांनी वाढत होते; तर १९९६-९७ ते २००३-०४ या काळात ही वाढ ०.५१ टक्के इतकी घसरली. याच काळात पिकाखालील एकूण क्षेत्र जे ०.७४ टक्क्यांनी वाढत होते, ते आता दरवर्षी सरासरी ०.५५ टक्क्यांनी कमी होत आहे. १९९०-२००८ या काळात अन्नधान्याचे उत्पादन सरासरी १.२ टक्क्यांनी वाढत गेले, तर लोकसंख्या १.९ टक्क्यांनी वाढली. दरडोई धान्याची उपलब्धता १९९०-९१ आणि २००५-०६ या काळात १७७ किलोवरून १५० किलो इतकी घसरली तर डाळींची उपलब्धता १५.३३ किलोवरून १२.०५ दरडोई इतकी खाली आली. २००५ ते २००८ या काळातही अन्नधान्यांच्या किंमतीतही प्रचंड वाढ झालेली आहे, विशेषतः तांदूळ आणि गहू यांच्या भावांत.

मात्र त्यांचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाही. बाबुराव गांधींसारखा शेतकरीही त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याची तक्रार करतो. मग बाबुराव शेतमाल बाजारात पाठविण्याऐवजी त्यावर घरगुती प्रक्रिया करणे किंवा तो शेजाऱ्यांना वाटून टाकणे असे मार्ग अवलंबितात. बाजार समितीतर्फे मालाची विक्री केली तरी पुरेसा भाव मिळत नाही, अशी तक्रार करतात. शेतमालाला योग्य भाव न मिळण्याची समस्या जुनीच आहे. पण शेती तोट्यात जाण्यास हेच एकमेव कारण आहे असे नाही. शेतकरी कर्जबाजारी होण्याची इतर कारणे म्हणजे शेतीमध्ये नवनवीन प्रयोगांना

अभाव, उत्पादकता आणि साठी विक्री यांमध्ये जाणवणारे धोके, शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या यंत्रणांचा अभाव आणि इतर जोड किंवा पर्यायी व्यवसायांची कमतरता. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा १९५०-५१ पासून सतत घसरतोच आहे. त्याचबरोबर वैयक्तिक शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमिनीचा आकार (क्षेत्रफळ) कमी होत चालला आहे. एक हेक्टरपेक्षाही ज्यांचे शेत लहान आहे अशा शेतकऱ्यांची संख्या १९७०-७१ मध्ये सुमारे ३॥ कोटी होती, ती २०००-०१ मध्ये सुमारे ८ कोटी झाली. एकूण ८२ टक्के शेतकऱ्यांकडे प्रत्येकी २ हेक्टरपेक्षा कमी किंवा २ हेक्टर इतकीच शेतजमीन आहे. म्हणजेच बहुसंख्य शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम अशी शेती करू शकत नाहीत. १९८१-१९९१ या काळात हरयाना आणि राजस्थानबरोबर महाराष्ट्रही कृषिक्षेत्रात अग्रेसर राज्य होते. त्यानंतर मात्र या क्षेत्रात महाराष्ट्राची पूर्ण पीछेहाट झालेली दिसते.

आजकाल जागतिक मंदीचा ~~xx~~ बराच बोलबाला होत आहे. निरनिराळ्या उद्योगांना तिचा कमीअधिक फटका बसतो आहे. वस्त्रोद्योग, गृहनिर्माण, वाहने आणि निर्यात या क्षेत्रांना साहाय्य म्हणून केंद्र सरकारने २० हजार कोटी रुपये देऊ केले आहेत. मंदीचा फटका उद्योगांना बसू नये म्हणून सरकार तत्परतेने त्यांच्या मदतीला धावून आले. पण शेतीक्षेत्रात गेली कित्येक वर्षे कायमचीच मंदी आहे. अजूनही ६० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे, ही गोष्ट लक्षात घेतली तर बहुसंख्य जनतेला कायमच्याच मंदीला तोंड द्यावे लागत आहे, असे म्हणावे लागते. या बहुसंख्यांसाठी सरकार काय करीत आहे? सिंचन, ऊर्जा उत्पादन, शेतीविषयक संशोधन, जोडधंदे, पणन व्यवस्था, विमा, शेतमाल साठविण्याची गुदामे, वगैरेत सरकारी गुंतवणूक सतत कमी होत आली आहे. शेतीत मुख्यतः गुंतवणूक खाजगी स्तरावरच होते.

जमिनीच्या छोट्याशा तुकड्यावर केली जाणारी शेती फायदेशीर होत नसल्याने या शेतकऱ्यांना अन्यत्र काम शोधावे लागते. असे सर्व लोक असंघटित (अनऑर्गनाइज्ड) क्षेत्रात मोडतात. अशा बहुसंख्यांना सरकारने ठरवून दिलेल्या किमान वेतनापेक्षाही कमी वेतन मिळते आणि सरकारने सुरू केलेल्या कामांमध्येही असेच कमी वेतन मिळते हे विशेष आहे. १९९० नंतरच्या काळात असे दिसते की सुमारे ८॥ कोटी जनता रोजी २० रुपये उत्पन्नावर जगते आणि त्यापैकी ३ कोटी लोकांचे रोजी उत्पन्न तर १० रुपयेच आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीतली वाढ लक्षात घेतली तर हे सर्व लोक कमालीचे अर्धपोटी आहेत, ही सद्यःस्थिती लक्षात येते. त्याचा विशेष फटका लहान मुलांना बसतो. जगातील ९॥ कोटी कुपोषित बालकांपैकी ५॥ कोटी कुपोषित बालके भारतात आहेत. बहुसंख्य जनतेच्या खिशात पैसाच येत नसल्याने त्यांची क्रयशक्ती फारच मर्यादित आहे, इतकी की जीवनाच्या आवश्यक वस्तूही त्यांना खरेदी करता येत नाहीत. आर्थिक

मंदीला सरकारी व्याख्येत जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा बसत नाही. फक्त श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्गीय यांच्या गरजा पुरविणाऱ्या उत्पादनांची मागणी कमी झाली की औद्योगिक क्षेत्रात मंदीची प्रचंड लाट आली आहे, असे अधिकृतरीत्या मानले जाते. १९९१ पासून या उद्योगक्षेत्रावर सरकारने सवलतींची आणि आर्थिक सहाय्याची खैरात केली आहे. परिणामी शासकीय उद्योग हे स्वतःही उद्योगांपेक्षा जास्त कर सरकारला देतात. सरकारी सवलतींचा लाभ सर्वात जास्त मिळतो संघटित क्षेत्रातील उद्योगांना. हे उद्योग त्यांच्या उत्पन्नाच्या फक्त सात-आठ टक्केच कर भरतात. शिवाय औद्योगिक क्षेत्रातील रोजगार-नोकरी यांच्या ~~[illegible]~~ संधी दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत आणि क्रयशक्ती कमी असलेल्या लोकांची संख्या फुगत चालली आहे, ही गोष्ट निराळीच. एकूण बहुसंख्यांना क्रयशक्ती नसल्यामुळे जीवनावश्यक वस्तूंनाही मागणी नाही, त्यांचे उत्पादन घटत चालले आहे, या गोष्टी आर्थिक मंदीच्या सरकारी व्याख्येत बसत नाहीत.

या वंचित लोकांना मदत म्हणून सरकारने ज्या योजना जारी केल्या आहेत, त्यामध्ये वर्षातून किमान १०० दिवस काम पुरविणारी नॅशनल रुरल एम्प्लॉयमेंट गॅरंटी स्कीम प्रमुख आहे. सध्या एक लाखपेक्षा जास्त गावात ही योजना लागू आहे. मात्र या योजनेसाठी जी कामे काढण्यात आली आहेत, त्यात जनतेचा सहभाग उत्स्फूर्त दिसत नाही. २००८ मध्ये फक्त छत्तीसगड, हरयाना, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यातच प्रत्येकी ५० दिवसांपेक्षा जास्त काम सरकारतर्फे देण्यात आले. सरकारी आकडेवारी सांगते की मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात, हरयाना, महाराष्ट्र, पंजाब, तामिळनाडू आणि उत्तराखंड या राज्यांत ज्यांनी काम मागितले त्या सर्वांना काम देण्यात आले. पण ज्या जिल्ह्यांत ही योजना राबविण्यात आली, त्यातील किती कुटुंबांनी या योजनेत भाग घेतला, असा विचार केला तर चित्र निराशाजनक दिसते. उदाहरणार्थ, पंजाब आणि महाराष्ट्रात फक्त अनुक्रमे ६.०७ आणि ८.८७ टक्के कुटुंबांनीच या योजनेत भाग घेतला. फक्त राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि आसाम या राज्यातच ४० टक्क्यांपेक्षा जास्त कुटुंबांनी या कामात हजेरी लावलेली आहे. बाकीच्या राज्यांत हे प्रमाण २२ ते ३५ टक्क्यांच्या दरम्यान आहे. एकूण या योजनेत काढली जाणारी कामे लोकांना फार आकर्षित करताहेत असे नाही. त्यात मिळणारे वेतन लोकांना पुरेसे वाटत नाही, असे दिसते.

एकूण मुख्य प्रश्न आहे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई कमी करण्याचा, त्यांचे उत्पादन वाढविण्याचा आणि त्यांच्या किंमती वाजवी राखण्याचा. जीवनावश्यक वस्तूंची सरकारी व्याख्या म्हणजे मुख्यतः अन्नधान्याचा पुरवठा. कपडे, निवारा, आरोग्यसेवा अशा गोष्टी सरकारी व्याख्येत येत नाहीत. १९७९ मध्ये जेव्हा दारिद्र्यरेषेची व्याख्या ठरविण्यात आली, त्यावेळी शहरी आणि ग्रामीण भागात दरदिवशी, दरडोई २१०० आणि २४०० कॅलरीजचा पुरवठा आवश्यक मानला गेला. मात्र इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च

यांच्या शिफारशीप्रमाणे जे लोक शारिरीक कष्टाची कामे करतात त्यांपैकी प्रत्येक पुरुषाला दररोज ३९०० कॅलरी आणि महिलेला २९२५ कॅलरी आवश्यक आहेत. आज किती कष्टकरी लोकांना इतके अन्न मिळते हा प्रश्न आहे. बहुतेक कष्टकऱ्यांचे वेतन आणि अन्नधान्याच्या किंमती पाहिल्या तर हे लोक अर्धपोटीच आहेत, असे मानण्यास हरकत नाही!

खरं तर जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनांना बाजारपेठेत कमी भाव मिळतो. त्यामुळे त्यांच्या उत्पादनात घट होते, बहुसंख्यांमध्ये क्रयशक्तीचा अभाव असणे, या सर्वांवर उपाय शोधायचा म्हणजे निव्वळ शेतीवर लक्ष केंद्रित करून चालणार नाही. जीवनावश्यक वस्तूंचा संबंध अनेक प्रकारच्या जैवभाराशी पोहोचतो, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामध्ये जळाऊ लाकूड, इमारती लाकूड, औषधी वनस्पती, विविध प्रकारचा चारा, एवढेच नव्हे तर सुपीक माती, शुद्ध पाण्याचे स्रोत, जलचर आणि पाणवनस्पती, पाळीव प्राण्यांची निगा आणि जोपासना आणि वन्य कीटक, पक्षी, प्राणी आणि वनस्पती अशा सर्व गोष्टींचा समावेश होतो. या सर्वांचा साकल्याने विचार झाला तरच आज जीवनावश्यक वस्तूंच्या बाजारपेठेत ठाण मांडून राहिलेली कायमची मंदी नाहीशी होईल आणि सर्वसामान्यांना योग्य असे जीवनमान कायमचे पहायला मिळेल. बाबुलाल गांधींच्या प्रयोगाचे महत्त्व हेच आहे की त्यांनी नेहमी सर्व घटकांचा साकल्याने विचार केला आहे.

कळत्या परिसराचा उदाहरणादाखल विचार करायचा म्हटले तर तिथल्या शेतजमिनी आणि पाण्याचा स्वतंत्रपणे विचार करून भागणार नाही. डोंगराचे माथे, डोंगर उतार, त्यावरून वाहणारे ओढे आणि त्यातून उगम पावणारे झरे, तिथली दऱ्या व घळईंची परिसंस्था, सपाटीवरील ओढ्या-नाल्यांची पात्रे, त्यांचे काठ, पडिक, नापीक जमिनी आणि कुरणे, शेतजमिनी आणि कोटरी, पाणथळी झाडोरा असा सर्वांचा समग्र विचार करून, त्यांच्यातील दुवे समजावून घेऊन संपूर्ण परिसराचा "लँडस्केप प्लॅन" तयार करून अंमलात आणला पाहिजे. दुर्दैवाने असा सर्वंकष विचार करणारे तज्ज्ञ आजच्या शिक्षण पद्धतीत तयार होऊ शकत नाहीत. आजच्या शास्त्र आणि तंत्रशिक्षणाचा रोख फक्त भौगोलिक, खनिज आणि रासायनिक ऊर्जाप्रणीत ज्ञाना-कडे आहे. जिवंत जैविक सृष्टी आणि जैवभार यांची ओळख विद्यार्थ्यांना होत नाही. साकल्याने, सर्वंकष रीतीने विचार करणे तर दूरच राहिले.

जमिनीचे छोटे छोटे तुकडे कसणारे शेतकरी जेव्हा एकत्र येऊन जमीन, पाणी आणि इतर जैविक घटक यांचा एकत्रित विचार करतील, तेव्हाच ग्रामीण भागातील कायमची मंदी नाहीशी होईल.

हे आहेत असंख्य बाबुलाल आणि त्यांचे सहित कुटुंबीय!

(या लेखातील आकडेवारी नामवंत अर्थतज्ज्ञांनी तयार केलेल्या डिक्लाईन ऑफ दी डेव्हलपमेंटल स्टेट, हानिश बुक्स, नवी दिल्ली, या अहवालातून घेतली आहे).

प्रकाश गोळे